वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

# विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालय

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, गाळा क्र. 39, उस्मानाबाद-413501

दुरध्वनी क्रमांक☎ 223408/ 223907 (02472)
Email dfoosmanabad@gmail.com

पत्र

विषय- Proposal for diversion of 5.8535 Ha. Forest Area (3.1668 Ha. in Osmanabad Forest Division) for proposed Greenfield Railway line between Solapur-Tuljapur-Osmanabad (Total Length of 84.439 Km) passing through Solapur and Osmanabad district in the State of Maharashtra.

जा.क्र.अ/ वसंअ/ 4047 /2022-23.
उस्मानाबाद.413501. दिनांक- 07 /02/2023.

प्रति,
उप मुख्य अभियंता (निर्माण)
मध्य रेल सोलापुर
जि.सोलापुर

संदर्भ-1.आपलेकडील पत्र क्रमांक 01/2023/दिनांक-02.01.2023.
2.या कार्यालयाचे पत्र क्रमांक अ/वसंअ/3745/ दिनांक 10.01.2023.
3.आपलेकडील पत्र क्रमांक CE(C)SUR/Forest/SUR-UmD New line/1/ दिनांक-12.01.2023.
4.या कार्यालयाचे पत्र क्रमांक अ/वसंअ/3899/ दिनांक 30.01.2023.

उपरोक्त विषयास अनुसरुन उप मुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल सोलापुर यांचेकडुन सोलापुर-तुळजापुर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पासाठी तुळजापुर तालुक्यातील 3.1668 हेक्टर आर वनजमीन भारतीय वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनजमीन मागणी प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला होता.

प्राप्त प्रस्तावाचे अनुषंगाने मौजे तुळजापुर ता.तुळजापुर जि.उस्मानाबाद व मौजे सांगवी मार्डी ता.तुळजापुर जि.उस्मानाबाद येथील बाधीत होत असलेल्या 3.1668 हे.आर. क्षेत्राची या विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा), उस्मानाबाद मु.लातुर व विभागीय कार्यालयातील वनसर्व्हेक्षक हे दिनांक 02.02.2023 रोजी सकाळी 12.00 वाजता प्रत्यक्ष जायमोक्यावर स्थळ पहाणी केली आहे. तसेच खालील स्वाक्षरीकर्ते यांनी दिनांक 06.02.2023 रोजी मौजे तुळजापुर ता.तुळजापुर जि.उस्मानाबाद येथील राखीव वन गट नं.44 मधील बाधीत होत असलेल्या क्षेत्राची प्रत्यक्ष जायमोक्यावर स्थळ पहाणी केली आहे.

मौजे तुळजापुर ता.तुळजापुर जि.उस्मानाबाद येथील गट नं.44 मधील राखीव वन 40.00 हे.आर क्षेत्रापैकी रेल्वे प्रकल्पात बाधीत होत असलेल्या 2.9592 हे.आर क्षेत्राचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. परंतु सदर क्षेत्राच्या स्थळ पहाणी वेळी राखीव वनाच्या हद्दी खुनाची तपासणी केली असता अंदाजित 1.00 हे.आर क्षेत्र बाधीत होत असल्याचे दिसुन आले आहे.

तरी प्रकल्प यंत्रणा यांना सुचित करणेत येते की, मौजे तुळजापुर ता.तुळजापुर जि.उस्मानाबाद येथील गट नं.44 मधील उर्वरीत क्षेत्र वनिवभागाच्या ताब्यात येत नसुन या बाबत पुन:श्च खातरजमा करुन घेवुन मौजे तुळजापुर ता.तुळजापुर जि.उस्मानाबाद येथील राखीव वन गट नं.44 मधील रेल्वे प्रकल्पात प्रत्यक्षात बाधीत होत असलेल्या क्षेत्राचा वन जमिन वळतीकरणाचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

( बी.ए.पोळ )
विभागीय वन अधिकारी
उस्मानाबाद.

प्रतिलिपी- मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केद्रस्थ अधिकारी म.रा.नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी- मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) वनवृत्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी- सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),उस्मानाबाद मु.लातुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत- वनपरिक्षेत्र अधिकारी तुळजापुर मु.उस्मानाबाद यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.